CSB

शासकीय कर्मचाऱ्यांने खाजगी संस्थांकडून पुरस्कार (Award) स्वीकारताना त्यात आर्थिक लाभाचा समावेश असता कामा नये.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : सीडीआर-१००८/प्र.क्र.३ /०८/११,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३ ऑक्टोबर, २००८.

परिपत्रक :-

शासकीय कर्मचाऱ्यांनी खाजगी संस्थांकडून पुरस्कार स्वीकारण्याच्या बाबतीत स्पष्टीकरण मागणारे संदर्भ प्राप्त होत आहेत. यासंबंधात महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम १३ याकडे लक्ष वेधण्यात येत आहे. त्यामध्ये अशी तरतूद आहे की, " कोणताही शासकीय कर्मचारी, शासनाची पूर्वपरवानगी मिळाल्याखेरीज त्याच्या संबंधातील किंवा दुसऱ्या कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यांच्या संबंधातील कोणत्याही गौरवपर भाषण समारंभास किंवा निरोप समारंभास मान्यता देणार नाही किंवा कोणतेही प्रशस्तिपत्र स्वीकारणार नाही किंवा त्याच्यासाठी अथवा दुसऱ्या कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यासाठी आयोजण्यात आलेल्या मनोरंजनपर कार्यक्रमास किंवा सभेस उपस्थित राहणार नाही. "

२. खाजगी संघटनांकडून, अधिकाऱ्यांना देण्यात येणारा पुरस्कार स्वीकारण्याच्या संबंधात कोणताही विनिर्दिष्ट नियम नाही. तथापि शासनाचे धोरण असे आहे की, जर एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याने कोणतेही विशेष उल्लेखनीय कार्य केले असेल तर, त्याच्या गुणवत्तेला आणि सेवेला मान्यता देण्याच्या विविध पद्धती शासनाकडेच असल्याने खाजगी संस्थेकडून असे पुरस्कार स्वीकारणे ही बाब, शासकीय कर्मचाऱ्यांसाठी उचित ठरणार नाही. तथापि काही विविक्त प्रकरणांमध्ये पुरस्कार देणारी संस्था ही अत्यंत प्रतिष्ठीत असल्यास आणि सदर पुरस्कारात कोणत्याही आर्थिक लाभाचा समावेश नसल्यास, पुरस्कार स्वीकारण्याबाबत आक्षेप घेण्यात आलेला नाही.

३. असे निदर्शनास आणणे प्रस्तुत ठरेल की, शासनाचे कार्यक्रम विस्तृत क्षेत्रांना लागू असल्याने, त्यापैकी काही कार्यक्रमांना चांगली प्रसिद्धी मिळते तर काही कार्यक्रमांना ती मिळत नाही; त्यामुळे पहिल्या प्रकारात काम करणा-या व्यक्तींना मान्यता देतांना अनुद्देशित पसंती दिली जाऊ शकते, ही बाब इष्ट नाही. या संस्थांपैकी ज्या संस्थांनी पुरस्कार देणे सुरु केले आहे त्या संस्थांचा देखील या कार्यक्रमात समावेश असण्याची शक्यता असते, त्यामुळे तेही शासनाला अडचणीचे ठरु शकते. याशिवाय, असे मान्य करण्यात आले आहे की, राज्य शासनाकडून घालून देण्यात आलेल्या धोरणाच्या चौकटीत न्यायरितीने काम करणे हे शासकीय कर्मचाऱ्याचे कर्तव्य असल्याने त्याने प्रसिद्धी किंवा सार्वजनिक मान्यता मिळविण्याचा प्रयत्न करता कामा नये. वास्तव शासकीय कर्मचाऱ्याने खाजगी संस्थांकडून देण्यात येणारे पुरस्कार मिळविण्याचा प्रयत्न करणे, ही बाब अशा कर्तव्यात बाधा आणू शकते. अंतिमतः, एखादी कामगिरी जिचा संबंध एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याशी जोडण्यात येतो ती, जवळजवळ नेहमीच अनेक व्यक्तींचे समन्वित प्रयत्न आणि

2-12-08
ESI-II

ROTA/H/1137 (4000-10-08)
27 NOV 2008
46098

विचार यांचा परिणाम असतो आणि केवळ एकाच व्यक्तीची कामगिरी नसते. म्हणून, सर्वसाधारणपणे, खाजगी संस्थांनी शासकीव कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या पुरस्कारांना उत्तेजन देण्याची आवश्यकता नाही असे वाटते. जर एखाद्या अधिकाऱ्याला शासनातील त्याच्या कामाच्या कार्यकक्षेबाहेर त्याने केलेल्या कामासाठी त्याच्या गुणवत्तेकरिता पुरस्कार देण्याच्या अपवादात्मक परिस्थितीत किंवा जेव्हा एखादी व्यक्ती पुरस्कार मिळण्यास पात्र आहे असे शासनाला अन्यथा वाटत असेल तेव्हा अशा बाबींवर संयुक्तिकपणे व विवेकशील पद्धतीने निर्णय घेणे हे सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्वेच्छानिर्णयावर राहील.

४. शासकीय कर्मचाऱ्याला खाजगी संघटनांकडून व्यक्तिगत पुरस्कार स्वीकारण्यासाठी परवानगी देताना ज्या मुख्य निकषाचे अनुपालन केले पाहिजे तो निकष असा आहे की, उक्त पुरस्कार रोख रकमेच्या स्वरुपात नसावा. "अत्यंत प्रतिष्ठीत संस्था" याची व्याख्या करणे कठीण आहे. तथापि त्यासाठी किमान निकष पुढीलप्रमाणे असावेत १) संस्थेचे स्वरुप अराजकीय आणि असांप्रदायिक असावे २) अशा संस्थाही राष्ट्रीय स्तरावरील किंवा राज्य स्तरावरील नावलौकिक असलेली असावी. ३) शासकीय अधिकाऱ्याचा पुरस्कार प्रदानासाठी विचार करावयाचा असल्यामुळे अशा संस्थेची कार्ये ही, शासनाच्या प्रचलित ध्येयधोरणे यांच्या विरोधात नसावीत.

अशा प्रकरणासंदर्भाने पुढे येणाऱ्या अशा नानाविध शक्याशक्यतांच्या संदर्भात नेमक्या सूचना समाविष्ट करणे शक्य नसल्यामुळे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रकरणपरत्वे निर्णय घेणे आवश्यक आहे.

५. आणखी असा निर्णय घेण्यात आला आहे की, खाजगी न्यास / प्रतिष्ठाने इ. कडून सुरु करण्यात आलेले आर्थिक लाभाचे पुरस्कार स्वीकारण्याची मुभा शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात येऊ नये

६. हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashrata. gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००८१०१३१११४९३४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(का.तु.सातकर)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत :

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
निवड नस्ती.

Awards by Government servant from private organizations should not have a monetary component

Government of Maharashtra
General Administration Department,
Government Circular no.CDR-1008/C.R.3/08/11,
Mantralaya, Mumbai 400 032.
Date : 13 th October, 2008.

**Circular :-**

References are being received seeking clarification in the matter of acceptance of awards by Government servants. Attention, in this connection is invited to Rule 13 of Maharashtra Civil Service (Conduct) Rule, 1979 which provides that "no Government servant shall, except with the previous sanction of the Government, receive any complimentary or valedictory address or accept any testimonial or attend any meeting or entertainment held in his honour; or in the honour of any other Government servant."

2. While there is no specific rule regarding the acceptance of awards conferred on officers by private organizations, however, the policy of the Government has been that if a Government servant has done any outstanding work, there are various methods open to Government itself to recognize his merits and service and it would not be appropriate for him to accept such an award from a private body. In some isolated cases, however the acceptance of awards was not objected to where the body giving the award was highly respected and the award did not include any monetary component.

3. It is relevant to point out that the activities of the Government extend over wide ranging fields some of which are well publicized and some are not; this could lead to an unintended preference in recognition for persons engaged in the former category which is not desirable. Some of the bodies which institute awards may also be involved in activities which may prove embarrasing for the Government. Moreover, it has been accepted that a civil servant should not strive to seek publicity or public recognition since his job is to act in a fair manner within the framework of the policy laid down by the political executive, seeking awards instituted by private bodies can affect such functioning. Finally, the achievement which may be attributed to a Government servant is almost always a result of coordinated efforts and thinking by a number of individuals and not the achievement of one person alone. Therefore, it is felt that, in general,

P.T.O...

awards sought to be given by private bodies and institutes to Government servants do not need to be encouraged. In case there are exceptional circumstances like rewarding the merit of an officer for work done outside the purview of his functions in Government or where Government otherwise thinks that an individual deserves a particular award, it is left to the discretion of the competent authority to decide such issues in a reasonable and judicious manner.

4. The main criteria, which may be followed while granting permission to individual Government servant to accept awards from private organizations is that such awards should not have a monetary component. It is difficult to define ' Highly Respected Institution'. However minimum criteria should be as follows 1) Institution should be Non-political and Non-communal in nature . 2) It should be Reputed Nationally or at State level. 3) Since Government Officer is considered for conferring the award activities of such Institution should not be against prevalent aims and policies of the Government. The competent authority must take decision on a case to case basis since instructions cannot precisely encompass the multitude of possibilities that can crop up in such matters.

5. Further it has been decided that the Government servants should not be allowed to accept awards of monetary benefit instituted by private trusts /foundations etc.

6. This Circular is made available on Government of Maharashtra website viz **www.maharashrata. gov.in** and the computer code number thereof is 200810131149340001.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**( K.T.Satkar )**
**Under Secreatary to Government of Maharashtra.**

To

The Secretary to the Governor,
The Principal secretary to the Chief Minister,
The secretary to the Deputy Chief Minister,
The Chief Secretary to Government,
All Additional Chief Secretary / All Principal Secretary /
All Secretary to Government
All other Head of Departments and Heads of Offices under the Several Departments of Mantralaya,
All Divisional Commissioners,
All District Collectors,